# कार्यावली

## गुरुवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता नागपूर येथील विधान भवनात सुरू होणा-या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२३ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनाची कार्यावली.

**एक** : उप सभापतींनी, सभापती-तालिका नामनिर्देशित करणे.

**दोन** : प्रश्नोत्तरे

**तीन** : सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्या सादर करणे व त्यावर चर्चा करणे.

**चार** : विधानपरिषद आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे.

**पाच** : मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

**सहा** : शासकीय विधेयक

**सात** : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**आठ** : शोक प्रस्ताव

**नऊ** : इतर प्रस्ताव

**दहा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा- म.वि.प.नियम ९७ अन्वये

**अकरा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे -म.वि.प.नियम १०१ अन्वये

**बारा** : **अशासकीय विधेयके -विचारार्थ-**

**(१) " सन २०२१ चे वि.प.वि. क्रमांक २** - महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण विधेयक, २०२१" - **श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांचे.**

(२) “ **सन २०२१ चे वि.प.वि. क्रमांक ७** - महाराष्ट्र धर्म द्वेषास आणि प्रेषित, पैगंबर व धर्मस्थाने यांची विडंबना करण्यास प्रतिबंध करण्यास विधेयक, २०२१” - **श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांचे.**

(३) “ **सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक १** - महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणा-या जाहिराती, जाहिरात-फलक लावण्यास, समाज माध्यमांवर व संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२३” - **श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.**

(४) “ **सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक २** - महाराष्ट्र अल्पभूधारक शेतकरी यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२३” - **श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.**

(५) “ **सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ३** - महाराष्ट्र राज्यातील युवक-युवतींना बेरोजगारी भत्ता विधेयक, २०२३” - **श्री. अंबादास दानवे, वि. प. स. यांचे.**

(६) “ **सन २०२३ चे वि. प. वि. क्रमांक ४** - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३” - **श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.**

(७) “ **सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ५** - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०२३” - **श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.**

(८) “ **सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ६** - महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३” - **श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.**

(९) “ **सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ७** - महाराष्ट्र राज्यातील बेकारीचे निर्मुलन करण्याबाबत विधेयक, २०२३” - **श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांचे.**

**तेरा : अशासकीय ठराव (म.वि.प. नियम १०२) —**

**श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २, ३, ४ व ५**

(२) “ राज्यातील किल्ले व दुर्ग यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ले व दुर्गांचा परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे व दुर्गांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या आणि किल्ल्यांची झालेली दुरवस्था थांबविण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(३) “ राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(४) “ शेतक-यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशक यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतक-यांना शेतमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतमालाचे भाव शेतक-यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(५) “ राज्यात दिवसेंदिवस वाढत चाललेली महागाई तसेच सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी करुनही सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी प्राप्त होत नाहीत, सेवायोजन कार्यालयाकडून नोकरीसाठी मुलाखतपत्रही प्राप्त होत नाहीत, परिणामी बेरोजगारांना चरितार्थासाठी कोणतेही साधन उपलब्ध न झाल्याने चरितार्थ चालविणे जिकरीचे झाले आहे, म्हणून पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पूढील ३ वर्षात नोकरी न मिळालेल्या बेरोजगारांना आर्थिक मदत म्हणून प्रतिमाह रुपये २५००/- बेकारी भत्ता देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६, ७, ८, ९ व १०**

(६) “ राज्यातील सर्व शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयात आणि सर्व स्तरावरील न्यायालयात, राज्याच्या एकंदरीत शासकीय व्यवहारांमध्ये मराठीचा १०० टक्के वापर होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्याची जबाबदारी राज्य शासनाने मराठी भाषा विभागाकडे सोपवावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(७) “ राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी तरुणांमध्ये निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकासारख्या आर्थिक संस्थांकडून येणा-या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या सोडवण्यासाठी व गरीब कुटुंबातील बेरोजगारांना रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(८) “ राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण अधिकतम वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पध्दतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशासकीय सेवा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(९) “ देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता लढा देवून त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर “भारतरत्न” प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(१०) “ राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी तरुणांमध्ये निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकासारख्या आर्थिक संस्थांकडून येणा-या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या सोडवण्यासाठी व गरीब कुटुंबातील बेरोजगारांना रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. सुनिल शिंदे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १२, १३, १४ व १५**

(१२) “ राज्यात विशेषतः मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई व इतर प्रमुख शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली लक्षणीय वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतूकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास, परिणामी वाहतूकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करित आहे.”

(१३) “ राज्यातील पोलिसांना सतत २४ तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याच्या घरात राहावे लागत आहे, शासनाकडून देण्यात येत असलेल्या शासकीय निवासस्थानांची अत्यंत दुरवस्था झाली आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न यांमुळे पोलीस बांधवांत निर्माण होत असलेले तणावाचे व नैराश्याचे वातावरण, परिणामी त्यांच्यावरील मानसिक ताण वाढत आहे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होवून त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(१४) “ राज्यात मुंबईसह इतर शहरांतील सदनिकांच्या किंमतीमध्ये सातत्याने होत असलेली प्रचंड वाढ, सदनिकांच्या किंमतीत मूळ किंमतीपेक्षा कितीतरी अधिक पटीने होत असलेल्या वाढीमुळे शहरात सदनिका विकत घेणा-या राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या स्वप्नपूर्तीत निर्माण होत असलेला अडसर, त्यामुळे सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करून स्थिर ठेवण्याबाबत सर्वसामान्य जनतेकडून होत असलेली आग्रही मागणी, तद्नुषंगाने सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्याकरिता राज्य शासनाने तातडीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(१५) “ केंद्र शासनाच्या अखत्यारीतील दादर येथील इंदू मिल्सच्या जागेवर महामानव परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यदिव्य स्मारक उभारण्याचे काम राज्य शासनाने हाती घेतले आहे, सदरहू निर्णयामुळे महाराष्ट्र शासनाची कीर्ती देशभरातच नव्हे तर पूर्ण जगभरात पसरलेली आहे, कोल्हापूर जिल्ह्यातील छत्रपती श्री शाहू महाराज यांचे इतिहासातील योगदान अमुल्य आहे, कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे जन्मलेल्या छत्रपती शाहू महाराज यांनी शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात केलेले काम अभूतपूर्व आहे, त्यांच्या या कामाची महती भावी पिढीस होणे गरजेचे आहे, यास्तव राज्य शासनाने केंद्र शासनाच्या अखत्यारीतील

इंदू मिल्सच्या जागेवर उभारण्यात येत असलेल्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्यदिव्य स्मारकाच्या धर्तीवर मुंबईतील ना. म. जोशी मार्ग व वरळी येथील सीताराम, पोद्दार व अपोलो मिल्स या केंद्र शासनाच्या अखत्यारीतील बंद गिरण्यांपैकी एका गिरणीच्या जागेवर छत्रपती शाहू महाराजांचे भव्यदिव्य स्मारक उभारण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**श्री. राजेश राठोड, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १६, १७, १८ व १९**

(१६) '' विदर्भात नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असूनही पीक विमा नुकसान भरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत आहेत, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटिशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१७) '' शेतक-यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशक यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतक-यांना शेतमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतमालाचे भाव शेतक-यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१८) '' राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतक-यांच्या शेतातील विहिरी व विद्युत पंपाचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत जोडणी मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे विद्युतपंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणा-या ऊस पिकांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१९) '' हिंदवी स्वराज्याचे संस्थापक ''छत्रपती शिवाजी महाराज'' सर्वत्र वंदनीय आहेत. कोल्हापूर विद्यापीठाचे शिवाजी विद्यापीठ असे नामकरण करण्यात आल्यामुळे महाराजांच्या नावाचा एकेरी उल्लेख होत आहे. हा प्रकार महाराष्ट्राच्या अस्मितेच्या दृष्टीने अयोग्य असल्याने शिवाजी विद्यापीठाचे नाव बदलून ''छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, कोल्हापूर'' असे करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**डॉ. वजाहत मिर्झा, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २०, २१, २२, २३ व २४**

(२०) “ राज्यात अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांची अवस्था चिंताजनक आहे, या समाजात शिक्षण व रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्याने हा समाज विकासापासून वंचित आहे, राज्य शासनाच्या अनेक योजना या समाजापर्यंत पोहोचत नसल्याने या समाजाला अनेक लाभ मिळत नाहीत, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ हे फक्त नावापुरते उरलेले आहे, या महामंडळाद्वारे एकाही ठिकाणी एकही व्यवसायिक व थेट कर्ज पूर्ण करण्यात आले नाही, मागील तीन वर्षांपासून या महामंडळाची कार्यकारणी सुद्धा घोषित केली नसून शासनाकडून या महामंडळास निधीही उपलब्ध करून दिला जात नाही, तसेच या समाजातील हजारो विद्यार्थ्यांना अनेक वर्षांपासून शिष्यवृत्ती देखील मिळत नाही, शाळांना योग्य अनुदान देखील मिळत नसल्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात देखील अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी मागास राहत आहेत, यामुळे या समाजातील नागरिकांच्या आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणामध्ये वाढ होऊन हा समाज विकासापासून दूरच राहिला आहे, या समाजाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उत्कर्षासाठी शासनाने अधिकाधिक प्रभावी उपाययोजना आखाव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(२१) “ विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प आहेत, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असून त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर भारनियमन होते, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगात होणारे आर्थिक नुकसान, विदर्भातील वीज इतरत्र जात असतानासुध्दा विदर्भातील वीज ग्राहकांकडून वीज हानीच्या नावाने पैसा वसूल करण्यात येतो, वीजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे यामुळे शेतक-यांच्या पिकांचे होणारे प्रचंड नुकसान, विजेअभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे, विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन देखील तेथील विकास होत नाही, विदर्भात उत्पादीत उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची नितांत गरज लक्षात घेता विदर्भातील भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(२२) “ राज्यात अनेक ठिकाणी पाणी टंचाईची स्थिती निर्माण झाली असून, ग्रामीण भागातील नागरिकांना चार-पाच मैल दूरवरुन पाणी आणण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. पावसाळ्यातील पाण्याची अनियमितता, निसर्गाचा लहरीपणा, त्यामुळे निर्माण होणारी भीषण पाणीटंचाई, परिणामी पिण्याच्या पाण्यासाठी होणारी भटकंती ही अतिशय गंभीर बाब झालेली आहे, त्यावर जलतज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून वेगवेगळी उपाययोजना करण्याची

आवश्यकता आहे, (उदा. रेन वॉटर हार्वेस्टींग) परंतू याबद्दलची अंमलबजावणी होताना दिसत नाही, महाराष्ट्रातील सर्व शासकीय तसेच खाजगी इमारतींच्या छतावर पडणा-या पावसाच्या पाण्याचे एकत्रीकरण (रेन वॉटर हार्वेस्टींग) करुन त्याचे इमारतीच्या आवारातील जमिनीत पाण्याच्या स्त्रोताजवळ पुनर्भरण करण्याची आवश्यकता आहे, शहरी भागांमध्ये हॉटेल्स, रेस्टॉरेंट व इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये पाण्याचा अपव्यय होताना दिसतो, तो देखील टाळण्याची आवश्यकता आहे, अशा अनेक उपाययोजना केल्यास राज्यात पिण्यासाठी, शेतीसाठी, औद्योगिक कामांसाठी व इतर वापरासाठीच्या पाण्याचा प्रश्न नक्कीच मार्गी लागेल. यासाठी शासनाकडून कठोर निर्देश देण्याची गरज आहे. तसेच राज्यात खाजगी नवीन इमारत बांधकाम करीत असताना बांधकाम परवाना देण्यासाठी जसे इतर बाबी तपासण्यात येतात, तसेच राज्यातील ग्रामपंचायत ते महानगरपालिका अंतर्गत येणा-या इमारतीवरील छताचे पाणी त्या आवारातील जलस्त्रोतात सोडण्याचे नियोजन आहे किंवा कसे हे तपासूनच बांधकाम परवानग्या द्याव्यात व अशाप्रकारे विविध उपाययोजना करुन पावसाचे पाणी व वैयक्तिक वापरासाठी असलेले पाणी यांचे योग्य नियोजन करण्यासाठी शासनाने अधिकाधिक उपाययोजना कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(२३) “ राज्यातील विनाअनुदान तत्वावरील मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(२४) “ राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करणे आवश्यक आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचा-यांची नेमणूक देखील

करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रॉमा सेंटर (Trauma Care Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रॉमा सेंटर (Trauma Care Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**श्री. जयंत आसगावकर, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २५, २६, २७ व २८**

(२५) ''राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(२६) '' राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करणे आवश्यक आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचा-यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रॉमा सेंटर (Trauma Care Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रॉमा सेंटर (Trauma Care Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(२७) “ केंद्र शासनाने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(२८) “ राज्यात प्रत्येक जिल्ह्यात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याची गरज लक्षात घेता, ज्या विभागामध्ये खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत, तेथे ती ताब्यात घेऊन पायाभूत सुविधांचा वापर करुन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु करावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. अभिजित वंजारी, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २९, ३०, ३१ व ३२**

(२९) “ विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प आहेत, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असून त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर भारनियमन होते, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगात होणारे आर्थिक नुकसान, विदर्भातील वीज इतरत्र जात असतानासुध्दा विदर्भातील वीज ग्राहकांकडून वीज हानीच्या नावाने पैसा वसूल करण्यात येतो, वीजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे यामुळे शेतक-यांच्या पिकांचे होणारे प्रचंड नुकसान, विजेअभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे, विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन देखील तेथील विकास होत नाही, विदर्भात उत्पादीत उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची नितांत गरज लक्षात घेता विदर्भातील भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(३०) “ राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळांडूचे देशी खेळांकडे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरु व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(३१) “ राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनांचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्यामुळे विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतक-यांचा होत असलेला विरोध,

त्याबाबत निर्माण केल्या जाणा-या कायदेशीर अडचणी इत्यादी बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे प्रलंबित काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३२) " राज्यात ज्येष्ठ नागरिकांच्या हितासाठी विविध निर्णय व धोरण ठरविलेले असताना त्याबाबतचे लाभ ज्येष्ठ नागरीकांना मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या, सुरक्षितता यासाठी ज्येष्ठ नागरिकांच्या हितासंबंधी धोरण ठरवून जनजागृती होण्याच्या दृष्टीने ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र हेल्पलाईन (मदतकेंद्र) संकेतस्थळ सुरू करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. धीरज लिंगाडे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ३४**

(३४) " विदर्भातील अमरावती विभागात विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या विभागात अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम व बुलढाणा इत्यादी जिल्ह्यांचा समावेश आहे. अमरावती येथे या पाचही जिल्ह्यांसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे विद्यापीठ असून या विद्यापीठात वाशिम, अकोला व बुलढाणा या भागातील लाखों विद्यार्थ्यांना शिक्षणाकरीता अमरावती येथे दिडशे किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावरुन प्रवास करुन विद्यार्जनासाठी जावे लागते, परिणामी त्यांचे श्रम, वेळ व पैसा खर्ची जात असतो, या भागातील लाखों विद्यार्थ्यांची अकोला, वाशिम व बुलढाणा या जिल्ह्यांकरीता बुलढाणा येथे " संत गजानन महाराज" या नावाने विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी असणे, या भागात शैक्षणिक बाबींचे जलदगतीने संनियंत्रण व नियोजन होण्याच्या दृष्टीने बुलढाणा येथे उपरोक्त तीन जिल्ह्यांकरिता " संत गजानन महाराज" या नावाने विद्यापीठ स्थापन करण्याची तातडीने कार्यवाही करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. सुधाकर अडबाले, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३६, ३७, ३८ व ३९**

(३६) " दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबाचे सर्वेक्षण झालेले नाही, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणा-या कुटूंबांना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागत आहे, शासनाच्या वतीने रुपये १५,०००/- उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे रुपये ५०,०००/- वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण झाली आहे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३७) " राज्यातील उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध होत नाही, उद्योगांमध्ये भूमिपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरूणांनी नोकरीसाठी केलेली नोंद उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोक-या मिळत नसल्याने राज्यातील सुशिक्षित तरूणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमिपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३८) " राज्यात महापूर, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट, भूकंप वगैरे नैसर्गिक संकटाना तोंड देण्यासाठी व बाधित नागरीकांना त्वरेने पुरेसे अर्थसहाय्य करण्यासाठी तसेच अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा निधी गोळा करणे व आपद्ग्रस्तांचे पुनर्वसन विनाविलंब होण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३९) " राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**डॉ. प्रज्ञा सातव, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४०, ४१, ४२, ४३ व ४४**

(४०) " राज्यात विशेषतः मराठवाड्यात सतत निर्माण होणारा भीषण दुष्काळ आणि तीव्र पाणी टंचाईची परिस्थिती लक्षात घेता दुष्काळ निवारणार्थ करावयाच्या कायमस्वरुपी उपाययोजना, मराठवाड्यात शेतीसाठी शाश्वत सिंचन अभियान सुरु करुन मराठवाड्यातील सिंचनाचा जलआराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मराठवाड्यासाठी सक्षम जल आयुक्तालय सुरु करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४१) " राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळांडूचे देशी खेळांकडे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरु व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४२) “ राज्यात अनाथ, निराधार, परितक्त्या, घटस्फोटित, विधवा, अनैच्छिक मातृत्व लाभलेल्या अपादग्रस्त व शिक्षणाचा अभाव असणा-या महिलांचा यात होणारा शारीरिक, मानसिक व सामाजिक छळ थांबवून त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती होण्याच्यादृष्टीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(४३) “ राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(४४) “ दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबाचे सर्वेक्षण झालेले नाही, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणा-या कुटूंबांना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागत आहे, शासनाच्या वतीने रुपये १५,०००/- उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे रुपये ५०,०००/- वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण झाली आहे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. रामदास आंबटकर, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४५, ४६ व ४७**

(४५) “ राज्यात विशेषतः विदर्भातील जिल्हा व ग्रामीण रुग्णालयांची स्थिती दयनीय आहे, रुग्णालयांतील सोयीसुविधा योग्य नसल्यामुळे दुर्बल घटकातील रुग्णांना योग्य उपचार मिळत नाहीत, त्यातच तज्ज्ञ डॉक्टरांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त आहेत, रुग्णालयातील देखभाल योग्यरित्या होत नसल्याने रुग्णालयांना आग लागण्याचे प्रकार मागील काही वर्षांत भंडारा, नागपूर, मुंबई व इतरही ठिकाणी घडले आहेत, यामुळे कित्येकांचे मृत्यू झाले आहेत, त्यामुळे रुग्णालयांचे संरचनात्मक लेखापरिक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करुन रुग्णांना योग्य सोय व उपचार होण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने योग्य पाऊल उचलावे व रुग्णालयाची स्थिती सुधारण्याकरिता भरीव निधी उपलब्ध व्हावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(४६) “ राज्यात विशेषतः विदर्भात आदिवासी, दुर्गम व ग्रामीण भाग असून सदरहू परिसरात मोठया प्रमाणात शेतकरी वर्ग आहे, परंतु शेतक-यांना आपल्या शेतात ये-जा करण्यास शेतरस्ते उपलब्ध नसल्याने शेतक-यांना हंगामाच्या वेळी कृषी अवजारे, बैल-बंडी, ट्रॅक्टर यासारखी अवजारे ने-आण करण्यास मोठी अडचण निर्माण होते. त्यातच काही परिसरात रस्त्याचे मातीकाम झाले आहे. त्यावर मजबुतीकरण झाले नसल्याने शेतक-यांचे जाणे-येणे जिकरीचे झाले आहे. याकरीता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे अभिसरण करून मातोश्री पांदण रस्ते योजना सन २०२१ मध्ये राबविण्याचा निर्णय घेतला असून सदर योजनेअंतर्गत शेतक-यांना रस्ते उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. “शेत तेथे रस्ता” या संकल्पनेतून सर्व शेतात जाण्या-येण्याकरीता जिल्हा व तालुक्यातील रस्ते तसेच गावाच्या शिव धु-यांवर शेतक-यांना जाण्या-येण्याकरीता पांदण रस्ते मोठ्या प्रमाणात हाती घेवून कामे तातडीने सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(४७) “ राज्यात विशेषतः आदिवासी दुर्गम भागातील शेतकरी गेल्या ७०-८० वर्षांपासून वन जमिनींवर अतिक्रमण करुन आपल्या कुटुंबांचा उदर निर्वाह करीत आहेत, परंतू अद्याप अतिक्रमण धारक शेतक-यांना पट्टे मिळाले नाहीत, सदर शेतकरी तीन पिढ्यांपासून असणा-या वन विभागाच्या जाचक अटींमुळे विशेषतः विदर्भातील वन परिसरातील आदिवासी भागातील अतिक्रमण पट्टे धारकता मिळण्यापासून वंचित आहेत, त्यामूळे वन विभागाने जाचक अटी रद्द करुन अतिक्रमण धारक शेतक-यांना त्वरीत शेतजमिनीचे वन पट्टे द्यावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्रीमती उमा खापरे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४८, ४९, ५०, ५१ व ५२**

(४८) “ राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि तत्सम इतर महानगरपालिकांमधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणा-या कच-याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कच-यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका, त्याठिकाणी होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासियांमध्ये संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इत्यादी बाबींना आळा घालण्यासाठी राज्यात स्वतंत्र कचरा प्रक्रिया विभाग आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(४९) “ राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, शहरांमध्ये वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिलांवरील अत्याचाराचे वाढलेले प्रमाण, पोलिसांच्या अपु-या संख्येमुळे तपासात होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणा-या विलंबामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, त्याकरिता पोलिसांच्या संख्येत करावयाची वाढ, पोलिसांच्या मानसिक स्थितीत सुधारणा करण्याकरिता तसेच महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(५०) “ राज्यात महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणा-या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत आहे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासन स्तरावर उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(५१) “ पुणे महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांच्या पुनर्बांधणी संदर्भात शासनाचे असलेले उदासीन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांची दुरस्ती होत नसल्याने ऐन पावसाळ्यात वाडे कोसळून जीवित, वित्त हानी होण्याचे प्रमाण वाढत आहे. जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांची योग्यरीत्या पाहणी न करणे तसेच वाड्यांच्या पुनर्रचनेची प्रलंबित असलेली अनेक कामे त्यामुळे पुणे महानगरपालिका क्षेत्रासाठी मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरिकांची मागणी होत आहे. यासंदर्भात साकल्याने विचार करून त्यावर परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(५२) “ राज्यात अनाथ, निराधार, परितक्त्या, घटस्फोटित, विधवा, अनैच्छिक मातृत्व लाभलेल्या अपादग्रस्त व शिक्षणाचा अभाव असणा-या महिलांचा यात होणारा शारीरिक, मानसिक व सामाजिक छळ थांबवून त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती होण्याच्यादृष्टीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५३, ५४ व ५७**

(५३) “ राज्यातील अनुसूचित जमातीच्या जात पडताळणी समित्यांनी दिलेल्या निर्णयाला फक्त उच्च न्यायालयातच अपिल करता येत असल्याने अनेक प्रकरणे निर्णय देताना हेतुपुरस्सर,

पुर्वग्रह दूषितपणे जाणीवपूर्वक विरोधात दिले गेल्याचे मा.उच्च न्यायालयात व मा.सर्वोच्च न्यायालयात वारंवार सिध्द होत असून अनेक प्रकरणी जात पडताळणी समित्यांना लाखांवर दंड, समज व निर्णय समितीच बरखास्त केल्याचे मा.उच्च न्यायालयाने/ मा.सर्वोच्च न्यायालयाचे शास्ती म्हणून आहे. जातपडताळणी समित्या त्यांचे निर्णय काही विवक्षित कारणामुळे मोठ्या प्रमाणात बदलत असल्याचे निदर्शनास येत असल्याने संपूर्ण आदिवासी समाजात जात पडताळणी समितीचे कामकाज पक्षपातीपणे होत असल्याचा जनक्षोभ मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेला आहे. खरा लाभार्थी वैधता प्रमाणपत्रापासून वंचित राहू नये म्हणून राज्य शासनाने राज्यातील अनुसूचित जमातीच्या जातपडताळणी समित्यांवर न्यायाधिशांची नेमणूक करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(५४) '' पालघर, ठाणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यासह किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे पाणी खारेपाणी शेत जमिनीत शिरून मालमत्तेचे झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांचे व लोकांच्या मालमत्तेचे होत असलेले नुकसान लक्षात घेता सुमुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने किनारपट्टीवरील जिल्ह्यातील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कार्याबद्दल कार्यक्रम आखून त्यांची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(५७) '' राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५८, ५९ व ६१**

(५८) '' राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(५९) “ राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सूचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(६१) “ शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत दिली जाते, त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. सुरेश धस, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६४, ६६ व ६७**

(६४) “ राज्यात महिलांवरील अत्याचारात दिवसेंदिवस वाढ होत असल्याने समाजाच्या सर्वच स्तरातून महिलांसाठी कठोर कायदा करून त्यांना सुरक्षितता देण्यासाठी प्रचंड जनक्षोभ निर्माण झालेला आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी गुन्हा अन्वेषण विभागाच्या धर्तीवर तात्काळ एक महिला पोलीस स्टेशन स्थापन करून, तसेच याबाबत कठोर कायद्याची निर्मिती करण्यात यावी व त्याची अंमलबजावणी तात्काळ करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(६६) “ विश्ववंदनीय “छत्रपती शिवाजी महाराजांचा” व स्वराज्य रक्षक “छत्रपती संभाजी महाराजांच्या” गौरवपूर्ण, वैभवशाली, आदर्शवादी, स्वातंत्र्याचं प्रतिक असलेला, महाराष्ट्राची मान जगात स्वाभिमानान उंचवणारा दृष्टीमान इतिहास हा शालेय शिक्षणात अत्यंत संक्षिप्त स्वरुपात आहे. हा संपूर्ण इतिहास राज्यात इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या अभ्यासक्रमात टप्प्याटप्प्याने समाविष्ट करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करित आहे.”

(६७) “ राज्यातील अनुसूचित जमातीच्या जात पडताळणी समित्यांनी दिलेल्या निर्णयाला फक्त उच्च न्यायालयातच अपिल करता येत असल्याने अनेक प्रकरणे निर्णय देताना हेतुपुरस्पर, पुर्वग्रह दूषितपणे जाणीवपूर्वक विरोधात दिले गेल्याचे मा.उच्च न्यायालयात व मा.सर्वोच्च न्यायालयात वारंवार सिध्द होत असून अनेक प्रकरणी जात पडताळणी समित्यांना लाखांवर दंड, समज व निर्णय समितीच बरखास्त केल्याचे मा.उच्च न्यायालयाने/ मा.सर्वोच्च न्यायालयाचे शास्ती म्हणून आहे. जातपडताळणी समित्या त्यांचे निर्णय काही विवक्षित कारणामुळे मोठ्या प्रमाणात बदलत असल्याचे निदर्शनास येत असल्याने संपूर्ण आदिवासी

समाजात जात पडताळणी समितीचे कामकाज पक्षपातीपणे होत असल्याचा जनक्षोभ मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेला आहे. खरा लाभार्थी वैधता प्रमाणपत्रापासून वंचित राहू नये म्हणून राज्य शासनाने राज्यातील अनुसूचित जमातीच्या जातपडताळणी समित्यांवर न्यायाधिशांची नेमणूक करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६८, ६९, ७०, ७१ व ७२**

(६८) " राज्यात मोठ्या प्रमाणात वाढणारी वाहनांची संख्या, दैनंदिन अपघातांचे वाढते प्रमाण, त्यामुळे होणारी जीवितहानी हे टाळण्यासाठी तसेच वेळ व इंधनाची बचत आणि विकासाच्या दृष्टीने राज्यातील सर्व राष्ट्रीय व राज्यमार्ग तसेच जिल्ह्या-जिल्ह्याला जोडणारे रस्ते हे चौपदरी करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६९) " राज्यात महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणा-या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत आहे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७०) " राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणीटंचाई, विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणीटंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७१) " राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयीसुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७२) " राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना घ्यावयाचे सर्व माध्यमातील शिक्षण हे अधिक परिणामकारक, प्रभावी होण्यासाठी आणि भविष्यात सक्षम पिढी उभी राहण्यासाठी सर्व शिक्षण विभाग (शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, आश्रमशाळा, अंध, अपंग, मूक-बधिर शाळा, आदिवासी आश्रम शाळा) हे मंत्रालयातील एकाच विभागाच्या अधिपत्याखाली आणावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७४**

(७४) " साखर कारखानदारी मध्ये पारदर्शकता येण्याच्या व स्पर्धात्मक दृष्टिकोनातून दोन साखर कारखान्यांमधील २५ किलोमीटर अंतराची अट शिथिल करण्याची मागणी राज्यातील शेतकरी व शेतकरी संघटना अनेक वर्षापासून करीत आहे, उक्त मागणीच्या अनुषंगाने दोन साखर कारखान्यांमधील २५ किलोमीटरच्या अंतराची अट शिथिल करण्याबाबत तसेच राज्यातील शेतकरी ऊस ज्या कारखान्याला देतात त्या कारखान्यांकडून त्यांना सभासदत्व देण्यात येत नाही त्या शेतक-यांना कारखान्याकडून सभासदत्व देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७८ व ७९**

(७८) " राज्यात महापूर, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट, भूकंप वगैरे नैसर्गिक संकटांना तोंड देण्यासाठी व बाधित नागरिकांना त्वरेने पुरेसे अर्थसहाय्य करण्यासाठी तसेच अशा आपत्तींना तोंड देण्यसासाठी पुरेसा निधी गोळा करणे व आपतग्रस्तांचे पुनर्वसन विनाविलंब होण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७९) " राज्यातील मोठ्या व मध्यम प्रकल्पांमुळे बाधित होणा-या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने निश्चित स्वरुपाचा एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी तातडीने करण्याच्या दृष्टीने शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**चौदा** : सर्वसाधारण सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबी.

**पंधरा** : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी अंतिम कार्यावली सोबत जोडण्यात येईल.)

**विधान भवन :**
नागपूर.
दिनांक : ०४ डिसेंबर,२०२३.

**जितेंद्र भोळे ,**
सचिव(१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शामुना-एचबी-२१४०-मविपना-१२-२०२३-५१०-प्रती-पीए५*